# ४८. शरद पोर्णिमा (कोजागिरी)

आपल्या हिंदूधर्मात सणांना व समारंभाला तोटा नाही. एकदा श्रावण महिना सुरू झाला की सर्व सण व समारंभ रांग लावूनच येतात.

दसरा सरला की लोकांना कोजागिरीचे वेध लागतात. कोजागिरी आणि भेळ याचे तर फार जूने नातेच आहे. ज्याकाळी लोकांना भेळ माहित नव्हती तेव्हा कोजागिरी कशी साजरी केली जात असेल ? अर्थात भेळेबरोबर मसाला दूध घेणे मला तरी आहारदृष्ट्या बरोबर वाटत नाही. असो. तश्यातर कितीतरी गोष्टी केल्या जातात पण त्यामागील कारण मीमांसा लक्षात येत नाही, तोपर्यंत मनात विचार चालू असतात.

हल्ली कोजागिरी घरापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात साजरी करण्याची सवय सहल कंत्राटदारांनी लोकांना लावली आहे. ८ - १० बस म्हणजे ५०० लोक घेऊन मुंबईपासून तास दोन तासांच्या अंतरावर घेऊन जायचे. हॉटेलात जेवायला घालायचे. सोबत एक, दोन कलाकार असणार, जे रात्री हॉटेलच्या बागेत लोकांची करमणुक करणार. लोकांना पण **Entertainment** की आपण सुप्रसिद्ध कलाकाराच्या संगतीत एक संध्याकाळ व रात्र घालवली. रात्री मसाला दूध देणार. पहाटेच्या पहिल्या प्रहरापर्यंत कार्यक्रम चालतो म्हणे ! उजाडण्यापूर्वी बसेस परत परतीच्या प्रवासाला लागतात. सकाळी ७ वाजण्यापूर्वी माणूस मुंबईला पोचला की कामावर जायचेच असेल तर जाऊ शकतो. ५०० लोकांच्या संगतीत मजा येत असेल ? कारण प्रत्येक ठिकाणी रांग लावल्याशिवाय तरणोपायच नाही. बसमध्ये जागा पकडण्यापासून जेवणासाठी, कार्यक्रमासाठी पुढली जागा अडवण्यासाठी आणि बरेच काही. सहल कंत्राटदारालासुद्धा आपण एक कर्तव्य केल्याचा आनंद.

काही लोक चौपाटीवर फिरायला जातात. काही लोक घरीच भेळेवर ताव मारून TV बरोबर संध्याकाळ घालवितात.

मला कोजागिरी साजरी केलेली फारशी आठवत नाही म्हणजे बाहेर फिरायला जाऊन वगैरे. तशी भेळ नक्कीच खाल्ली आहे. घरी बसून, कधी अभ्यास करताना, काम करताना, संगणकावर काम करताना.

ह्या वर्षीची म्हणजेच २५ - १० - २००७ ची शरद पोर्णिमा मात्र मी विसरून्च शकणार नाही. खरेतर त्याचीच ही गोष्ट.

ह्या वर्षी कोजागिरीपूर्वीच मी माझ्या गावाला आलो होतो. कोजागिरी साजरी करायचे मनात आले. मला नशिबाने नेहमी चांगले शेजारी मिळतात. माझ्या शेजा-याला पण **Idea** पसंद पडली. आमच्या गावाला एक नितांत सुंदर किनारा आहे आणि तो पण स्वच्छ. किना-यावर सुरूच्या झाडांची लागवड सरकारने केली आहे. अर्थात मूळ उद्देश किना-याचे संरक्षण करणे हा आहे. झाडे एवढी उंच व जवळ जवळ आहेत कि भर दुपारी सूर्याचा प्रकाश जेमतेमच जमिनीपर्यंत पोचतो.

सर्व झाडे ठराविक अंतरावर लावली आहेत त्या मुळेच त्या जंगलात झाडांच्या मधून फिरायला फारच मजा येते. पायाखाली वाळू असते त्यामुळे चालताना व्यायाम पण होतो.

आम्ही सर्वांनी रात्री सूर्य मावळयानंतर किना-यावर जाण्याचे ठरविले. किनारा घरापासून ५ मिनीटांवर आहे. हल्ली सूर्यास्त लवकरच होतो.संध्याकाळी मी व सौ. तळयावर फिरायला गेलो. सूर्यास्ताचे फोटो काढले. चंद्र लाजत लाजत उगवत होता. घरी आलो. थोडावेळ आराम केला व नंतर आम्ही सर्वजण विजे-या घेऊन समुद्रकिनारी निघालो. काळोख प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. आपल्या शहारातल्या लोकांना काळोख फक्त भारनियमनाच्या वेळेलाच कळतो पण त्या काळोखाची मजा अनुभवायला शरीराला व मनाला उसंत नसते.

झाडांच्या मधून पाऊलवाटेवरून आम्ही किना-यावर पोचलो. चंद्राच्या प्रकाशात चांदण्या लुकलुकताना दिसत होत्या. समुद्र शांत होता. आम्ही वाळूत बसलो. गाणी ऐकली , गप्पागोष्टी केल्या. चंद्राचे फोटो काढले. चंद्राचा शीतल प्रकाश वेगळीच अनुभूती देत होता. चंद्राच्या प्रकाशात किती सामर्थ्य असते यांची पहिल्यांदाच प्रचिती आली. संपूर्ण परिसारात कोठेही वीजेचा पत्ता नव्हता. नाही म्हणायाला लांबवर दिपस्तंभ आपले काम चोख बजावित होता.

माणसाला चांगले मरण हवे असेल तर अग्नि , सूर्य , चंद्र व आकाश यांचे आशीर्वाद असणे आवश्यक असते.

माणसाला चंद्रासारखे शीतल होता आले पाहिजे. शीतल ह्या शब्दाचा अर्थ सांगून समजणार नाही त्यासाठी असेच पोर्णिमेच्या दिवशी निरव शांततेत व काळोखात चंद्रदर्शन घेतले पाहिजे.

तासभर किना-यावर चंद्रदर्शन घेऊन आम्ही घरी परतलो. अर्थात भेळेचा मेनू होताच.

मनसोक्त भेळ खाऊन ‘चक दे’ सिनेमा बघितला.सांघिक सामर्थ्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही हा अति आवश्यक संदेश सिनेमाच्या माध्यमातून निर्माता / दिग्दर्शक देत होता. सिनेमासाठी हॉकी हा खेळ निवडला होता.

आपआपसातील मतभेद , उच्च-नीच , अनुभवी-नवीन वगैरे मुद्दे बाजूला ठेवून आपण सर्वजण एक संघ म्हणून एका उद्दिष्टाने प्रयत्न करणे कसे जरूरीचे आहे हे सांगितले आहे.

तसे तर सांघिक सामर्थ्य प्रत्येक गोष्टीतच आवश्यक असते.मग ते घरातील काम असो कि कचेरीतील , कारखान्यातील. आज जगात काही देशांनी केवळ सांघिक सामर्थ्यावर प्रगति केली आहे. भारतात मात्र ह्या संज्ञा सिनेमाच्या माध्यमातून शिकवायची वेळ येते. काय ही परिस्थिती ?

सिनेमा संपल्यानंतर आम्ही सर्व जण मसाला दूध प्यायलो व नंतर एकमेकांना शुभरात्री म्हणत मी व सौ. घरी परतलो. मनात एक अविस्मरणीय अनुभव घोळवत. पुढील वर्षी ह्याच दिवशी गावाला येण्याचा निश्चय करूनच आम्ही निद्रादेवीच्या आधीन झालो. पण त्यापूर्वी परत एकदा घराच्या **Balcony** मधून चंद्राचे दर्शन घ्यायला विसरलो नाही.

कोजागिरीच्या चंद्राचे फोटो मी जेव्हा जेव्हा संगणकावर बघिन तेव्हा ह्या सर्व आठवणी परत फेर धरून नाचतिल ह्याची मला खात्री आहे.

मला आता पुढच्या कोजागिरी पोर्णिमेचे वेध लागले आहेत. एवढा पुढचा विचार माणसाने करावा का ?